दूरध्वनी क्रमांक : २५५०११२३
पुणे महानगरपालिका
शिवाजीनगर,पुणे ४११००५.
अपिल प्राधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
यांचे कार्यालय.

माहितीचा अधिकार

अपील क्रमांक - ४३/२०१७
जा क्र.साप्र/२८३७ दि. ५/१/१८

अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त, सामान्य प्रशासन यांचे कार्यालय
पुणे महानगरपालिका

अपील क्र. /४३ /२०१७

**श्री गणेश महादू खुरे** — **अपिलार्थी**
**३७८ शुक्रवार पेठ,**
**पुणे २**

**विरुद्ध**

प्रशासन अधिकारी तथा जन माहिती अधिकारी — जन माहिती अधिकारी
आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका
शिवाजीनगर पुणे ५.

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये अपील**

अपिलार्थीने दि. २७/११/२०१७ रोजी प्रशासन अधिकारी आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांचेकडे अर्ज करून “सेवकवर्ग विभागाकडून सहायक पो. निरीक्षक शिवाजीनगर पो. स्टेशन यांना देण्यात आलेल्या जा. क्र. ३०१६ दि. १०.१२.२०१२ अन्वये देण्यात आलेल्या माहितीच्या प्रती”, असा विषय नमूद करून माहिती मागविली होती. जन माहिती अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांनी जा. क्र. २४०९ दि.२६.१२.२०१७ ने सदर अर्जास उत्तर पाठविले आहे.

| माहिती अधिकारात अर्ज सादर केल्याचा दि. | माहिती उपलब्ध करून द्यावयाचा अंतिम दि. | अपिलार्थीस उत्तर पाठविल्याचा दि. | अर्जदाराने शुल्क भरल्याचा दि. | अर्जदारास माहिती दिल्याचा दि. |
|---|---|---|---|---|
| २७.११.२०१७ | २६.१२.२०१७ | २६.१२.२०१७ | - | अर्जास उत्तर देण्यात आले आहे. |

अपिलार्थी यांनी “माहिती देण्यास टाळाटाळ” असे नमूद करून दि. २८.१२.२०१७ रोजी अपील अर्ज दाखल केला आहे.

## प्रथम अपिल अर्जाचा तपशील

| प्रथम आपेल दाखल करावयाचा अंतिम दि. | प्रथम आपेल दाखल केल्याचा दि. | प्रथम आपेल अर्ज मुदतीत दाखल केला आहे का? | प्रथम आपेलाच्या विलंबाबाबत निवेदन दिले आहे का? | प्रथम आपेल सुनावणी सूचना पाठविल्याचा दि. |
|---|---|---|---|---|
| २४.०१.२०१८ | २८.१२.२०१७ | आहे. | - | २९.१२.२०१७ |

सदर अपिलावर दि. ०५.०१.२०१८ रोजी सुनावणी घेण्यात आली. सदर सुनावणीस अपिलकर्ता श्री गणेश खुरे उपस्थित होते तसेच जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग यांचे प्रतिनिधी श्वेता काथवटे उपस्थित होते.

### विवेचन

श्री गणेश खुरे अपिलार्थी यांनी अर्जामध्ये नमूद केलेले **"सेवकवर्ग विभागाकडून सहायक पो. निरीक्षक शिवाजीनगर पो. स्टेशन यांना देण्यात आलेल्या जा. क्र. ३०१६ दि. १०.१२.२०१२ अन्वये देण्यात आलेल्या माहितीच्या प्रती"** ची माहिती मिळाली नसल्याचे सांगितले. जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग यांचे प्रतिनिधी श्वेता काथवटे यांनी जा. क्र. २४०९ दि. २६.१२.२०१७ ने त्यांना सदर बाबत उत्तर दिले असल्याचे व त्यांना पाठविलेले पत्र पोस्ट मधून परत आले असल्याचे सांगितले. त्यावर अपिलार्थी यांनी मला माहिती समक्ष पाहिजे होती असे सांगितले. जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग यांनी दि. २६.१२.२०१७ रोजी सदर बाबत अपिलार्थी यांना कळविले होते परंतु पोस्टाचा पत्ता अव्यवस्थित नसल्याने ते पत्र परत आले असल्याचे दिसून येते.

### आदेश

अपिलार्थी यांना माहिती अधिकार कायदा २००५ नुसार उत्तर देण्यात आले आहे. परंतु ती त्यांना मिळाली नसल्याने त्यांना माहिती विनामुल्य उपलब्ध करून द्यावी.

०५/०१

(अनिल मुळे)
अपिल प्राधिकारी
तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका.